दहशतवाद विरोधी पथक, सोलापूर युनीट
स्थापन करण्यास मान्यता देण्याबाबत...

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
शासन निर्णय क्रमांकः अेपीओ-१२१७/प्र.क्र.४८/पोल-३
मंत्रालय, दुसरा मजला, मुख्य इमारत,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई
दिनांक : १८ सप्टेंबर, २०१७.

<u>वाचा</u> :-

१) गृह विभाग शासन निर्णय क्रमांकः एसएसए-१००६/प्र.क्र.३६३/विशा-४, दिनांक २३.०४.२००७.
२) गृह विभाग शासन निर्णय क्रमांकः आयएसएस-१००९/प्र.क्र.६०/विशा-४, दिनांक २७.०७.२००९.
३) वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२०१५/प्र.क्र.४१/अर्थ-१,दि.०२.०६.२०१५
४) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र.पोमसं/२६-ब/दविप औ.नाग/७०/२००६, दिनांक १६.०५.२०१७.
५) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र.पोमसं/२६-ब/दविप औ.नाग/७०/२००६, दिनांक १३.०६.२०१७.

<u>प्रस्तावना</u> :-

दहशतवाद विरोधी पथकाच्या कामाची व्याप्ती तसेच दहशतवाद विरोधी पथक, पुणे युनीटच्या कार्यक्षेत्रामध्ये पुणे पोलीस आयुक्तालय, सोलापूर पोलीस आयुक्तालय व कोल्हापूर परिक्षेत्रामधील सर्व जिल्ह्यांचा समावेश होतो. दहशतवाद विरोधी पथक, पुणे युनीटच्या कार्यक्षेत्रातील भौगोलीक परिस्थिती व संवेदनशील ठिकाणे विचारात घेता सदर युनीटचे कार्यक्षेत्र प्रचंड मोठे आहे. सदर युनीटच्या कार्यक्षेत्रामधील भागांचे शहरीकरण झपाट्याने वाढत असून त्यानुषंगाने गुन्हेगारीचे प्रमाण देखील वाढत आहे. सोलापूर शहर व परिसरामधील दहशतवादी संघटना यांचे हस्तक यांची माहिती घेणे, त्यांच्या विरोधात कारवाई करणे, दहशतवादी तसेच देश विघातक कारवायांना आळा घालणे इत्यादी करीता दहशतवाद विरोधी पथक, पुणे युनीटचे विभाजन करुन स्वतंत्र सोलापूर युनीट निर्माण करण्याची पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी उपरोक्त संदर्भाधिन क्र. ४ व ५ येथे नमूद अनुक्रमे दिनांक १६.०५.२०१७ व दिनांक १३.०६.२०१७ च्या पत्रान्वये शासनास विनंती केली आहे. त्यानुषंगाने शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

<u>शासन निर्णय</u>:-

दहशतवाद विरोधी पथक, पुणे युनीटचे विभाजन करुन सोलापूर येथे दहशतवाद विरोधी पथकाचे नवीन युनीट स्थापन करण्यास व सदर युनीटकरीता दहशतवाद विरोधी पथक, पुणे युनीटकरीता मंजुर करण्यात आलेली खालील तक्यात नमूद पोलीस अधिकारी व कर्मचारी यांची १७ पदे स्थानांतरणाने उपलब्ध करुन देण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

अ.क्र.	पदाचे नाव	पदांची संख्या	पदनिर्माती केलेल्या शासन निर्णयाचा क्रमांक व दिनांक
१.	पोलीस निरीक्षक	०१	गृह विभाग, शासन निर्णय क्रमांक आयएसएस - १००९/प्र.क्र.६०/विशा-४, दि.२७.०७.२००९
२.	सहायक पोलीस निरीक्षक	०१	गृह विभाग, शासन निर्णय क्रमांक एसएसए - १००६/प्र.क्र.३६३/विशा-४, दि.२३.०४.२००७
३.	पोलीस उप निरीक्षक	०२	गृह विभाग, शासन निर्णय क्रमांक एसएसए - १००६/प्र.क्र.३६३/विशा-४, दि.२३.०४.२००७
४.	पोलीस हवालदार	०२	गृह विभाग, शासन निर्णय क्रमांक एसएसए - १००६/प्र.क्र.३६३/विशा-४, दि.२३.०४.२००७
५.	पोलीस नाईक	०४	गृह विभाग, शासन निर्णय क्रमांक एसएसए - १००६/प्र.क्र.३६३/विशा-४, दि.२३.०४.२००७
६.	पोलीस शिपाई	०६	गृह विभाग, शासन निर्णय क्रमांक एसएसए - १००६/प्र.क्र.३६३/विशा-४, दि.२३.०४.२००७
७.	चालक पोलीस शिपाई	०१	गृह विभाग, शासन निर्णय क्रमांक एसएसए - १००६/प्र.क्र.३६३/विशा-४, दि.२३.०४.२००७
एकूण		**१७**	

२. दहशतवाद विरोधी पथक, पुणे युनीटचे विभाजन करुन दहशतवाद विरोधी पथक, सोलापूर युनीट निर्माण केल्यानंतर उक्त नमूद दोन्ही युनीटचे कार्यक्षेत्र खालील तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे असेल :-

अ.क्र.	दहशतवाद विरोधी पथक युनिटचे नाव	कार्यक्षेत्र
१.	पुणे युनीट	पुणे पोलीस आयुक्तालय, कोल्हापूर परिक्षेत्रातील पुणे ग्रामीण व सातारा जिल्हा.
२.	सोलापूर युनीट	सोलापूर पोलीस आयुक्तालय व कोल्हापूर परिक्षेत्रामधील सोलापूर ग्रामीण, सांगली व कोल्हापूर जिल्हा

३. उपरोक्त नवनिर्मित दहशतवाद विरोधी पथक, सोलापूर युनीटकरीता आवश्यक वाहने व साधनसामग्री ही अपर पोलीस महासंचालक, दहशतवाद विरोधी पथक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या आस्थापनेवर उपलब्ध संसाधनामधून पुरविण्यात यावी.

४. सदर शासन निर्णय वित्त विभाग शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१५/प्र.क्र.४१/अर्थ-१, दि.०२.०६.२०१५ अन्वये विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७०९१८१७२८१०४१२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Dhiraj K Abhang

Digitally signed by Dhiraj K Abhang
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Home Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=b83edfcbaa0fddb5983e8303bccd9a96ef7cc55853b8b449ff8dc53d69f1618d, cn=Dhiraj K Abhang
Date: 2017.09.18 17:18:13 +05'30'

(धीरज कां. अभंग)
कार्यासन अधिकारी, गृह विभाग

प्रत,

१. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव.

२. मा. विरोधी पक्षनेता, विधानपरिषद, विधानभवन, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
३. मा. विरोधी पक्षनेता, विधानसभा, विधानभवन, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
४. राज्यमंत्री, गृह (शहरे) यांचे खाजगी सचिव.
५. मा.राज्यमंत्री, गृह (ग्रामीण) यांचे खाजगी सचिव.
६. अपर मुख्य सचिव (गृह), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
७. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
८. प्रधान सचिव (विशेष), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
९. अपर पोलीस महासंचालक, दहशतवाद विरोधी पथक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१०. पोलीस आयुक्त, पुणे शहर.
११. पोलीस आयुक्त, सोलापूर शहर.
१२. विशेष पोलीस महानिरीक्षक, कोल्हापूर परिक्षेत्र, कोल्हापूर.
१३. पोलीस अधीक्षक, कोल्हापूर/ पुणे ग्रामीण/ सातारा/ सांगली/सोलापूर ग्रामीण.
१४. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
१५. जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे.
१६. जिल्हा कोषागार अधिकारी, सोलापूर.
१७. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, वांद्रे, मुंबई.
१८. निवड नस्ती, पोल-३.